सत्यमेव जयते

# विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे कार्यालय (विकास शाखा)

दालन क्र. ११०, पहिला मजला, कोंकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४

क्र.विआकों-ससंअ./हमसम/२०२५/ विआकों-१७०११(११)/४६/२०२५-RDD

**प्रति,**

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.**

**विषय — "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत वर्ष २०२५ मध्ये १० कोटी वृक्ष लागवड बाबत.**

**संदर्भ** — १. महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रमांक : सावधि-२०२५ /प्र.क्र.२८/फ-११, दि. ११/०६/२०२५.
२. मा. अपर मुख्य सचिव (वने) यांचे पत्र क्रमांक :- सावधि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११, दि. ०५/०८/२०२५.
३. उप सचिव, ग्राम विकास विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक RDD-७६०१९/२१/२०२५-RDD(आस्था-५अ), दि. २८ जुलै, २०२५.

राष्ट्रीय वन नितीप्रमाणे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३% क्षेत्र वनांनी आच्छादित असणे आवश्यक आहे. तथापि महाराष्ट्र राज्यामध्ये २१% क्षेत्रच वनांनी व्यापलेले आहे. सदर वनक्षेत्राची तूट भरुन काढण्याकरीता शासनाने संदर्भ १ च्या शासन निर्णयान्वये विभाग/ प्राधिकरण निहाय वर्ष २०२५ मध्ये **"हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" अभियान** राबविण्याचे योजिले आहे. सदर अभियान हे लोक चळवळ म्हणून राबविण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांचे निर्देश आहेत. या मोहिमेंतर्गत १० कोटी वृक्ष लागवड करण्याचे ध्येय निश्चित केले आहे.

**ग्रामविकास विभागाकरीता १ कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट विहित करुन दिले आहे. विहित उद्दिष्ट ऑगस्ट,२०२५ व सप्टेंबर,२०२५ या दोन महिन्यांमध्ये पूर्ण करावयाचे आहे. सदर मोहिम जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. संदर्भ ३ च्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे कोकण विभागातील जिल्हानिहाय वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट नेमून दिले आहे.**

| अ.क्र. | जिल्हा | वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट |
|---|---|---|
| १ | ठाणे | १,५४,३०० |
| २ | पालघर | १,६७,५०० |
| ३ | रायगड | २,५०,३०० |
| ४ | रत्नागिरी | ३,०३,२०० |
| ५ | सिंधुदुर्ग | १,५४,२०० |
| | **एकूण** | **१०,२९,५००** |

सदर अभियानाची यशस्वी अंमलबजावणी होण्याकरीता **"मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद" यांना "नोडल अधिकारी" नेमण्यात आले आहे.** संदर्भिय पत्रांमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करुन योग्य कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात यावेत, ही विनंती.

**सोबत :- संदर्भ १,२ व ३ चे पत्र.**

Signed by
Manik Namdeo Dive
Date: 07-08-2025 18:58:03
(डॉ. माणिक नामदेव दिवे)
**अपर आयुक्त (विकास),**
**कोंकण विभाग.**

दूरध्वनी क्रमांक ०२२-२७५६६६१२ ई- मेल : nbadivkonkan@gmail.com

"हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत वर्ष २०२५ करिता १ कोटी वृक्ष लागवड मोहीम राबविण्यासाठी जिल्हापरिषद निहाय उद्दिष्टे वाटप...

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः RDD-७६०१९/२१/२०२५-RDD(आस्था-५अ)

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.
तारीख: २८ जुलै, २०२५

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांकः **महसूल व वन विभाग, क्र. सापवि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११,दि. : १०.०६.२०२५**

२) शासन निर्णय क्रमांकः **महसुल व वन विभाग,क्र. साववि-२०१६/प्र. क्र. ८० (भाग२)/फ़-११, दि. २५.०७.२०१८**

**प्रस्तावना**

राष्ट्रीय वन नितीप्रमाणे एकुण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वन आणि वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत राज्यात वन आणि वृक्षाच्छादनाचे प्रमाण २१.२५ टक्के आहे. जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ॠतूबदल याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याचे महत्व वैश्विक स्तरावर मान्य झालेले आहे. राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत वर्ष २०२५ करीता १० कोटी वृक्ष लागवड मोहिम लोक चळवळ म्हणून राबविण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.०४.०६.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये निर्देशित केले आहे. १० कोटी वृक्ष लागवडीच्या अनुषंगाने १० टक्के अधिक वृक्ष लागवडीचे नियोजन विचारात घेऊन ग्रामविकास विभागासाठी एकूण १ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट महसूल व वन विभागाने निश्चित केले आहे. त्यानुषंगाने ग्रामविकास विभागांतर्गत "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानासाठी वर्ष २०२५ करीता १ कोटी वृक्ष लागवड मोहिम जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत स्तरावर राबविण्याची बाब प्रस्तावित आहे.

**शासन परिपत्रक :**

राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी ग्रामविकास विभागांतर्गत "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानासाठी वर्ष २०२५ करीता १ कोटी वृक्ष लागवडीचे नियोजन विचारात घेऊन प्रत्येक जिल्हापरिषदनिहाय वृक्ष लागवडीचे उद्दीष्टे खालीलप्रमाणे वाटप करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | जिल्हा परिषद | वृक्ष लागवडीचे उद्दीष्टे |
|---|---|---|
| १ | अकोला | १९१४०० |
| २ | अमरावती | २५१००० |
| ३ | अहिल्यानगर | ४७४००० |
| ४ | कोल्हापूर | ४०७००० |
| ५ | गडचिरोली | १६२१०० |
| ६ | गोंदिया | १५४४०० |
| ७ | चंद्रपूर | २१३६०० |
| ८ | छ. संभाजीनगर | ३११८०० |
| ९ | जळगांव | ३५४३०० |
| १० | जालना | ३१८९०० |
| ११ | ठाणे | १५४३०० |
| १२ | धाराशिव | २६२७०० |
| १३ | धुळे | १९९८०० |
| १४ | नंदूरबार | १८९१०० |
| १५ | नांदेड | ४६९००० |
| १६ | नागपूर | २७३९०० |
| १७ | नाशिक | ४९६९०० |
| १८ | परभणी | २६२००० |
| १९ | पालघर | १६७५०० |
| २० | पूणे | ४९६५०० |
| २१ | बीड | ३७०५०० |
| २२ | बुलढाणा | ३५१५०० |
| २३ | भंडारा | १९३१०० |
| २४ | यवतमाळ | ४३०३०० |
| २५ | रत्नागिरी | ३०३२०० |
| २६ | रायगड | २५०३०० |
| २७ | लातूर | ३२१४०० |

| | | |
|---|---|---|
| २८ | वर्धा | १८६५०० |
| २९ | वाशिम | १९५८०० |
| ३० | सांगली | ३४९२०० |
| ३१ | सातारा | ४६५२०० |
| ३२ | सिंधुदुर्ग | १५४२०० |
| ३३ | सोलापूर | ३९७००० |
| ३४ | हिंगोली | २२१६०० |
| | **एकूण** | **१००००००० (१ कोटी) वृक्ष** |

सदर शासन परिपत्रकान्वये वृक्ष लागवडीचे नियोजन करण्याबाबत पुढीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात येत आहेत :-

१) "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत जिल्हा परिषदेचे उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्ह्याचे नोडल अधिकारी असतील.

२) सन २०२५ या वर्षासाठी वृक्षांची लागवड करण्यासाठी अशासकीय संस्थांमार्फत रोपे उपलब्ध करुन घेण्यात यावीत. सर्व जिल्हापरिषदांनी त्यांच्यां अंतर्गत पंचायत समिती व ग्रामपंचायती यांच्या मार्फत वृक्ष लागवड करण्याची कार्यवाही करावी. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना विशिष्ट उद्दिष्ट देवून त्याप्रमाणे वृक्ष लागवड नियोजित करणे आवश्यक आहे. वृक्षारोपण करताना प्रामुख्याने त्या-त्या भागामधील भौगोलीक परिस्थिती विचारात घेऊन त्या भागात वाढ होऊ शकणाऱ्या स्थानिक प्रजातींची प्राधान्याने लागवड करावी.

३) विभागामार्फ़त करण्यात येणारी वृक्ष लागवड विभागाच्या अखत्यारीत असलेल्या जमीनीवर करण्यात यावी. त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायती यांच्या कार्यालये तसेच जिल्हा परिषद मालकीच्या जागांवर सदरचे वृक्ष लागवड करण्याची कार्यवाही करावी.

४) महसुल व वन विभागाच्या दि. ११.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५) त्याचप्रमाणे वृक्षरोपण झाल्यानंतर वृक्षारोपण स्थळांची जिओ टॅगिंगसह माहिती, वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण किमान दर ६ महिन्यांनी छायाचित्रांसह वन विभागाच्या प्लॅटफॉर्मवर अपलोड करण्याची कार्यवाही करावी. सदर माहितीचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कार्यालयात स्थापन झालेल्या कमांड कन्ट्रोल रुममार्फत संनियंत्रण केले जाईल. तसेच रोपे लागवडीची स्थळ नोंदणी/जिओ टॅगिंग इत्यादी मुलभूत माहिती अपलोड करण्याची सुविधा वन विभागाचे संकेतस्थळ www.mahaforest.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 202507281201321220 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUBHASH BABAN INGALE

Digitally signed by SUBHASH BABAN INGALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=ff061387998f39ca303c7da669fe0471ca884215afebe7e53ecc009e02aad1ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F0319D46C62F9F6D7DBC200D9693539DF215A28C05D55971515AC3C87DDAA987, cn=SUBHASH BABAN INGALE
Date: 2025.07.28 12:38:50 +05'30'

**( सुभाष इंगळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. विरोधी पक्षनेते, विधान परिषद/विधानसभा, विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
४. सर्व मा. विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खासगी सचिव.
६. मा. मंत्री, ग्राम विकास विभाग यांचे खासगी सचिव.
७. मा. राज्यमंत्री, ग्राम विकास विभाग यांचे खासगी सचिव.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
९. सर्व मंत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
१०. प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग) यांचे स्वीय सहाय्यक.
११. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञाता) (लेखा परीक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१२. विभागीय आयुक्त, सर्व.
१३. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृह निर्माण, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
१४. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृह निर्माण, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
१५. जिल्हाधिकारी,सर्व.
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व.
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१८. कार्यासन अधिकारी (आस्था-५अ), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवड नस्ती(आस्था-५अ).

**"हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत वर्ष २०२५ करीता १० कोटी वृक्ष लागवड मोहिम राबविण्याकरीता विभागनिहाय उद्दीष्टे वाटप करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: सावनि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ११ जून, २०२५

**प्रस्तावना:-**

राष्ट्रीय वन नितीप्रमाणे एकुण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वन आणि वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत राज्यात वन आणि वृक्षाच्छादनाचे प्रमाण २१.२५ टक्के आहे. जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतूबदल याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याचे महत्व वैश्विक स्तरावर मान्य झालेले आहे.

राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत वर्ष २०२५ करीता १० कोटी वृक्ष लागवड मोहीम लोक चळवळ म्हणुन राबविण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.०४.०६.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये निर्देशित केले आहे. त्यानुषंगाने राज्यात १० कोटी वृक्ष लागवड मोहीम राबविण्याकरिता संबंधित विभागांशी सल्लामसलत करुन वृक्ष लागवड व संगोपनाचे नियोजन करण्यात आले असून त्याअनुषंगाने विभागनिहाय उद्दीष्टे वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णयः-**

राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत वर्ष २०२५ करीता १० कोटी वृक्ष लागवडीच्या अनुषंगाने १० टक्के अधिक वृक्ष लागवडीचे नियोजन विचारात घेऊन विभाग/प्राधिकरणनिहाय वृक्ष लागवडीचे उद्दीष्टे खालीलप्रमाणे वाटप करण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | विभाग/प्राधिकरण | उद्दीष्टे |
|---|---|---|
| १. | रेशीम लागवड (वस्त्रोद्योग विभाग) | ४ कोटी |
| २. | वन विभाग (एफडीसीएम,बांबु बोर्डसह) | २ कोटी |
| ३. | कृषी/फलोत्पादन विभाग | १ कोटी |
| ४. | ग्रामविकास विभाग | १ कोटी |
| ५. | नगरविकास विभाग | १ कोटी |
| ६. | शालेय शिक्षण विभाग | २० लक्ष |
| ७. | सार्वजनिक बांधकाम विभाग | १५ लक्ष |
| ८. | जलसंपदा विभाग | ५ लक्ष |
| ९. | महसुल विभाग | ५ लक्ष |
| १०. | उद्योग विभाग | ५ लक्ष |
| ११. | गृह विभाग | ५ लक्ष |
| १२. | उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग | ५ लक्ष |
| १३. | मृद व जलसंधारण विभाग | ५ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| १४. | सहकार, पणन आणि  वस्त्रोद्योग विभाग | ४ लक्ष |
| १५. | सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ लक्ष |
| १६. | उर्जा विभाग | ३ लक्ष |
| १७. | आदिवासी विकास विभाग | ३ लक्ष |
| १८. | पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय विभाग | २ लक्ष |
| १९. | महिला आणि बाल कल्याण विभाग | २ लक्ष |
| २०. | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | २ लक्ष |
| २१. | पर्यटन विभाग | १ लक्ष |
| २२. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | २० लक्ष |
| २३. | राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण | २० लक्ष |
| २४. | रेल्वे  विभाग | २० लक्ष |
| २५. | संरक्षण (डिफेन्स) विभाग | ५ लक्ष |
| २६. | "एक पेड माँ के नाम- २.०" | ५० लक्ष |

**रोपांची उपलब्धता :-**

वन विभागाकडे वर्ष २०२५ लागवड हंगामाकरीता पुरेशी रोपे उपलब्ध नसल्याने इतर विभागांना रोपे उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. त्यामुळे इतर सर्व विभागांनी विभागाच्या स्तरावर शासन नियमानुसार रोपे खरेदी करुन वृक्ष लागवडीचे विभागाचे उद्दीष्ट पूर्ण करावे. वृक्षारोपण प्रामुख्याने त्या त्या भागांमधील भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन त्या भागात वाढ होऊ शकणाऱ्या स्थानिक प्रजातींची प्राधान्याने लागवड करावी.

**निधीची उपलब्धता :-**

शासन निर्णय क्रमांक साववि-२०१६/प्र.क्र.८०(भाग-२)/फ-११, दिनांक २५ जुलै, २०१८ नुसार वृक्षारोपण आणि संगोपनासाठी प्रत्येक प्रशासकीय विभाग यांना दरवर्षी उपलब्ध होणा-या एकंदरीत अर्थसंकल्पित तरतुदींपैकी कार्यक्रमावरील खर्चामधुन (पूर्वीची योजनांतर्गत तरतुद) ०.५ टक्के मर्यादेत निधी उपलब्ध करणेबाबत तरतुद आहे. सदर शासन निर्णयानुसार सर्व विभागांनी निधी उपलब्धततेबाबत आवश्यक कार्यवाही तातडीने करावी. वन विभागांतर्गत वृक्ष लागवडीची मोहीम योजनांच्या माध्यमातून व त्याकरिता लागणारा निधी विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमधून करावी.

**सर्वसाधारण सूचना :-**

१. प्रत्येक प्रशासकीय विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांनी त्यांचे विभागाचे उद्दीष्टांप्रमाणे जिल्हानिहाय उद्दीष्टये तात्काळ वाटप करावे. तसेच आपल्या विभागाच्या नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी व त्याबाबत वन विभागास तात्काळ अवगत करावे.
२. विभागस्तरावर विभागीय आयुक्त यांनी सदर मोहिमेच्या यशस्वितेकरिता वेळोवेळी आढावा घ्यावा.
३. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी या मोहिमेच्या यशस्वितेकरीता वरील विभागांचा आढावा घेऊन जिल्ह्यांचे उद्दीष्टांप्रमाणे Land Bank तयार करुन माहे जुलै/ऑगस्ट महिन्यात वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पूर्ण करावे. वृक्ष संगोपनासाठी योग्य नियोजन करण्याकरिता आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच

वृक्ष लागवड मोहिमेसाठी आवश्यक निधी जिल्हा योजनांमधून (DPC) जास्तीत जास्त उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा.

**मोहिमेचे संनियंत्रण :-**

रोपे लागवडीची स्थळ नोंदणी/जिओ टॅगिंग इत्यादी मुलभूत माहिती अपलोड करण्याची सुविधा वन विभागाचे संकेतस्थळ www.mahaforest.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचा वापर करुन मोहिमेची माहिती अपलोड करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५०६१११५४६३८२२१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVIKIRAN SABAJI GOVEKAR

Digitally signed by RAVIKIRAN SABAJI GOVEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=223dbaf509e56a22dd8c9d33c199767837144d5824e70117 45d9a521fdbedad3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B752370B557D0A3E58B4B069230BC54F6A13D04798 D2EE7A3F1C7DCC5655271C, cn=RAVIKIRAN SABAJI GOVEKAR
Date: 2025.06.11 15:47:19 +05'30'

**(डॉ.रविकिरण गोवेकर)**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रत:-**

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (वने) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक.
६. अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग यांचे स्वीय सहायक.
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे.
११. प्रधान मुख्य वनसंरक्षक (महाकॅम्पा).
१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, नागपूर.
१३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.
१४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास बोर्ड, नागपूर.
१६. सर्व विभागीय आयुक्त.
१७. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
१८. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे/प्रधान मुख्य अभियंता, मध्य रेल्वे.
१९. प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, मुंबई/नागपूर.
२०. संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
२१. संचालक, रेशीम संचलनालय, नागपूर.
२२. सर्व मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव/सामाजिक वनीकरण).
२३. सर्व जिल्हाधिकारी.

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग, दालन क्र. ४६० (विस्तार), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दूरध्वनी क्र. २२७९४३२४ ०२२ Email ID : deskf११.rev-mh@gov.in

---

**क्रमांकः- साववि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११** **दिनांकः- ५ ऑगस्ट, २०२५**

**विषयः- "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ करीता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेबाबत.**

**संदर्भः- १. शासनाचे पत्र क्र.साववि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११, दि.११.०६.२०२५ (इतिवृत्त)**
**२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सावविं/प्र.क्र.२८/फ-११, दि.११.०६.२०२५**

मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.०४.०६.२०२५ रोजीच्या बैठकीत "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ करीता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्याचे निर्देशीत केले असून त्याअनुषंगाने बैठकीचे इतिवृत्त आवश्यक कार्यवाहीसाठी आपणाकडे संदर्भाधीन दि.११.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले होते. तसेच संदर्भाधीन दि.११.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये १० कोटी वृक्ष लागवडीचे विभागनिहाय उद्दिष्टांचे वाटप करून त्याअनुषंगाने जिल्हानिहाय उद्दिष्टांचे वाटप करण्याबाबत सर्व संबंधित विभागांच्या प्रमुखांना सूचित करण्यात आले होते. तसेच सदर शासन निर्णयानुसार विभागस्तरावर विभागीय आयुक्तांनी व जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांनी मोहिमेच्या यशस्वितेकरिता वेळोवेळी आढावा घेण्याबाबत सूचित करण्यात आले होते.

"हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत १० कोटी वृक्ष लागवडीची उद्दिष्ट ३० सप्टेंबर पर्यंत पुर्ण करणे आवश्यक असून त्यास आता केवळ २ महिन्यांचा कालावधी शिल्लक राहिला असल्याने, सदर मोहिम अधिक प्रभावीपणे मिशन मोडवर राबविणे अत्यंत गरजेचे आहे. सबब, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक आठवड्याला जिल्ह्यातील सर्व विभाग/यंत्रणांकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन वृक्ष लागवडीची माहिती अमृतवृक्ष मोबाईल ॲपवर अद्यावत करण्याबाबत संबंधितांना निर्देशीत करावे. तसेच यासंदर्भात विभागीय आयुक्तांनी देखील विभागाच्या स्तरावर सर्व संबंधितांचा आढावा प्रत्येक आठवड्याला घ्यावा. तसेच माहे जुलै ३१ अखेरपर्यंत आपल्या जिल्हा/विभागांतर्गत केलेल्या कार्यवाहीबाबत जिल्हावार प्रगती अहवाल शासनाला दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ पर्यंत सादर करावा.

(मिलिंद म्हैसकर)
अपर मुख्य सचिव (वने)

प्रति,

१. विभागीय आयुक्त सर्व.
२. जिल्हाधिकारी सर्व.

प्रत-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग, दालन क्र. ४६० (विस्तार), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दूरध्वनी क्र. २२७९४३२४ ०२२ Email ID : deskf११.rev-mh@gov.in

---

**क्रमांक:- साववि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११** **दिनांक:- ११ जून, २०२५**

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व प्रशासकीय विभाग.
२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
३) महानगर आयुक्त, एमएमआरडीए, मुंबई.
४) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ), म्हाडा.
५) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
६) सर्व विभागीय आयुक्त, महसूल विभाग.
७) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
८) सर्व आयुक्त, महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
९) महानगर आयुक्त, पीएमआरडीए, पुणे.
१०) आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे/ संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर/ संचालक, उच्च शिक्षण संचालनालय.
११) महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे / प्रधान मुख्य अभियंता, मध्य रेल्वे.
१२) प्रादेशिक अधिकारी, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, मुंबई/ प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, मुंबई/ प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर.
१३) सर्व मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव/सामाजिक वनीकरण).
१४) आयुक्त, मनरेगा, नागपूर.
१५) सर्व जिल्हाधिकारी.
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१७) उप वनसंरक्षक/ विभागीय वनअधिकारी (प्रादेशिक/ वन्यजीव/सामाजिक वनीकरण).
१८) मुख्य अधिकारी, नगरपरिषद.

**विषय:- मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भातील दि.०४ जून, २०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

**महोदय,**

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भातील बुधवार, दि.०४.०६.२०२५ रोजी दुपारी १:३० वाजता मंत्रीमंडळ सभागृह, सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

२. सदर बैठकीचे इतिवृत्त आपणांस पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठवण्यात येत आहे.

**आपला,**

**(डॉ.रविकिरण गोवेकर)**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**सोबत-वरीलप्रमाणे.**

प्रत-

१. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. मंत्री (वने) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

५. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.

८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, नागपूर

९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे.

११. प्रधान मुख्य वनसंरक्षक (महाकॅम्पा).

१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास बोर्ड, नागपूर

१३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.

१४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.

पत्र क्र.सावचि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११, दि.११.०६.२०२५ रोजीचे सहपत्र.

**मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भातील दि.०४.०६.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

अपर मुख्य संचिव (वने) यांनी मा.मुख्यमंत्री महोदय, मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदय, मा.मंत्री (वने) महोदय व मा.राज्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदय यांचे तसेच विविध विभागांच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करुन प्रस्तावित वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भात वन विभागाचे सादरीकरण केले. त्यामध्ये जागतिक पातळीवरील वनक्षेत्राची आकडेवारी नमूद करुन भारतातील वनक्षेत्राचे प्रमाण अन्य देशांच्या तुलनेत खूपच कमी असल्याचे अधोरेखित केले. राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार वन आणि वृक्षाच्छादित क्षेत्र भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्क्यांपर्यंत साध्य करावयाचे झाल्यास भविष्यात राज्याकरीता किमान २४० कोटी वृक्ष लागवड करणे आवश्यक असल्याचे सांगितले. वन विभागामार्फत यापूर्वी राबविण्यात आलेल्या ५० कोटी वृक्ष लागवड मोहीमेची माहिती देऊन या मोहीमेची फलश्रुती म्हणून राज्याच्या वन आणि वृक्षाच्छादनात सर्वच क्षेत्रात वाढ झाली असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. त्यानंतर वृक्ष लागवड मोहीमेच्या अनुषंगाने विविध विभाग निहाय वृक्ष लागवडीच्या तयारीबाबत सादरीकरण केले. सादरीकरणानंतर मा.मुख्यमंत्री महोदयांनी वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भात मार्गदर्शन करुन खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत:-

| अ. क्र. | चर्चेचा विषय/मुद्दे | मा.मुख्यमंत्री यांचे निर्देश/ घेतलेले निर्णय | अंमलबजावणी करणारी यंत्रणा | अंमलबजावणी चा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | सन २०२५ च्या पावसाळ्याकरीता वृक्ष लागवड मोहीमेचे उद्दिष्ट. | सन २०२५ च्या पावसाळयाकरिता १० कोटी वृक्ष लागवडीची मोहीम राबवावी. वन विभागाने इतर विभागांशी विचारविनिमय करुन तयार केलेल्या यावर्षीच्या उद्दिष्टांनुसार संबंधित सर्व विभागांनी कार्यवाही करावी. पुढील ३ वर्षांमध्ये अधिक व्यापक प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात यावी व आवश्यक पूर्वतयारी करावी. | सर्व विभाग, वन विभाग (नोडल विभाग), वृक्ष लागवडीचे विभागनिहाय लक्ष्य (परिशिष्ट-अ). | तात्काळ |
| २. | वृक्ष लागवडीसाठी पुरेशा प्रमाणात जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणांचा (Land Bank) शोध घेणे (महसूल विभाग, एमआयडीसी, साखर कारखाने, सुत गिरण्या इत्यादी). | सर्व विभागांनी आपल्या विभागांतर्गत वृक्ष लागवडीसाठी पर्याप्त जागांचा (Land Bank) शोध घेऊन वृक्ष लागवडीची मोहीम हाती घ्यावी. | वृक्ष लागवडीकरीता जागा उपलब्ध असलेले सर्व विभाग. | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | **रोपांची उपलब्धतता तसेच त्या त्या भागांमधील लागवडक्षम स्थानिक प्रजातींची निवड करुन रोपांची निर्मिती करणे.**<br>➢ मा.मंत्री (वने) महोदयांनी भौगोलिकदृष्ट्या लागवडीस योग्य असलेल्या स्थानिक प्रजाती विशेषत: कोकणातील सुरंगी सुगंधी फुलाचे झाड, बहाडोली जांभूळ, रायवळ आंबा इ. लागवड प्राधान्याने करण्याबाबत सूचित केले.<br>➢ सध्या वन विभागाकडे ९ महिने किंवा अधिक कालावधीची सुमारे १.८ कोटी रोपे आहेत.<br>➢ महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय सावंवि-२०१६/प्र.क्र.८० (भाग-२)/फ-११, दिनांक २५ जुलै २०१८ अन्वये प्रत्येक विभागाने त्यांच्या मंजूर बजेटमधून ०.५% निधी वृक्षारोपणासाठी खर्च करण्याची तरतूद आहे. | वेळ कमी असल्याने यंदाच्या मोहिमेसाठी इतर विभागांनी आपापल्या पातळीवर रोपांची खरेदी करावी. रोपांची खरेदी व देखभालीसाठी लागणारा निधीची उपलब्धता दि.२५ जुलै, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार करावी. पुढील मोहिमांसाठी वन विभाग हे अन्य विभागांना आवश्यकतेनुसार रोपे उपलब्ध करून देईल. वृक्षारोपण प्रामुख्याने त्या त्या भागांमधील भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन त्या भागात वाढ होऊ शकणाऱ्या स्थानिक प्रजातींची प्राधान्याने लागवड करावी. | सर्व विभाग | तात्काळ |
| ४. | **रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करणेबाबत.**<br>➢ मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदयांनी रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करतेवेळी भविष्यात होणारी वाढ व विस्तार विचारात घेऊन करणे आवश्यक असल्याचे, तसेच रेन ट्री सारखे परदेशी वृक्ष न लावण्याबाबत सूचित केले. | सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अखत्यारित येणाऱ्या राज्य मार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्ग यांच्या दुतर्फा वृक्ष लागवडीची संपूर्ण जबाबदारी वन विभागाकडे सुपूर्द करण्याची कार्यवाही करावी. संबंधीत यंत्रणांनी यासाठी लागणारा निधी देखील वन विभागास उपलब्ध करून द्यावा. राष्ट्रीय महामार्ग | सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, वन विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI). | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्राधिकरणाने (NHAI) राष्ट्रीय महामार्गांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्याबाबत केलेल्या तरतुदींची तातडीने अंमलबजावणी करावी. तसेच भविष्यातील रस्त्यांचे रुंदीकरण व मजबूतीकरण विचारात घेऊन वृक्ष लागवड करावी. | | |
| ५. | भौगोलिकदृष्टया कमी वन व वृक्षाच्छादन असलेल्या मराठवाड्यातील लातूर, बीड इ. जिल्ह्यांमध्ये सर्व विभागांनी विशेष मोहीम राबवून वृक्ष लागवड करण्याबाबत. | वन विभाग तसेच जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भौगोलिकदृष्टया कमी वन व वृक्षाच्छादन (१० टक्क्यांपेक्षा कमी) असलेल्या जिल्ह्यांमध्ये वृक्ष लागवडीची विशेष मोहीम राबवावी. | वन विभाग, महसूल विभाग, ग्रामविकास विभाग व संबंधीत जिल्ह्यातील सर्व विभाग. | तात्काळ |
| ६. | पर्यायी वनीकरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या जागेवर (Compensatory Afforestation Land) वृक्ष लागवड करुन वृक्षाच्छादनात वाढ करणे. | बऱ्याच मोठ्या प्रमाणात पर्यायी वनीकरणाची जागा उपलब्ध असून अशा जागांवर विशेष मोहीम राबवून कॅम्पा निधीमधून वृक्ष लागवड करण्यात यावी. | वन विभाग | तात्काळ |
| ७. | कार्बन उत्सर्जन प्रक्रियेत जास्त वाटा असलेल्या प्रत्येक विभागाने कार्बन फूटप्रिंट तयार करुन कार्बन न्यूट्रलायझेशनसाठी प्रयत्न करणे. | उद्योग विभागांतर्गत एमआयडीसी मार्फत तसेच इतर संबंधीत विभागांनी त्यांची कार्बन फूटप्रिंट तयार करुन कार्बन न्यूट्रलायझेशनसाठी वृक्ष लागवडीची विशेष मोहीम राबवावी. | उद्योग विभाग, ऊर्जा विभाग, परिवहन विभाग व इतर संबंधीत विभाग. | तात्काळ |
| ८. | लागवडीकरिता रोपांची निवड करणे. | वृक्ष लागवडीसाठी सुदृढ व सशक्त रोपांची निवड करावी. खाजगी रोपवाटिकांमधून रोपे खरेदी करताना शक्यतो दीड ते दोन वर्षांची दर्जेदार रोपे खरेदी करुन लागवड करावी. | सर्व विभाग | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | **वृक्ष लागवडीची मोहीमेत पारदर्शकता आणणे.** | वृक्षलागवडीचे जिओ-टॅगिंग (spatial tagging) करावे आणि AI आधारित मोबाईल ॲप वापर करुन संनियत्रंण यंत्रणा बळकट करावी व योग्य डेटाबेस ठेऊन मोहीम संपूर्णपणे पारदर्शकरित्या राबवावी. | सर्व विभाग | तात्काळ |
| १०. | **बांबू अभियानाला प्राधान्य देणे.** | बांबू लागवड पर्यावरणीय व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे असून, याची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी सर्व विभागांनी आणि जिल्हा यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेऊन राज्यात मिशन मोडवर बांबू लागवड करावी. | सर्व विभाग, महामंडळे, प्राधिकरणे व जिल्हा यंत्रणा. | तात्काळ |
| ११. | **बांबू वृक्ष कुंपणांचा (Tree Guards) वापर करणे.** | महाराष्ट्र बांबू विकास महामंडळाकडून तयार करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक बांबू वृक्ष कुंपणांचा (Tree Guards) वृक्षसंवर्धनासाठी उपयोग करण्यास प्रोत्साहन द्यावे (विशेषत: महापालिकांच्या कार्यक्षेत्रात). | सर्व विभाग | तात्काळ |
| १२. | **प्रामुख्याने गडचिरोली सारख्या जिल्ह्यामध्ये मायनिंगखाली जाणारे वनक्षेत्र विचारात घेऊन उच्च क्षमतेच्या नवीन रोपवाटिकांची निर्मिती करणे.** | गुणवत्तापूर्ण रोपांची निर्मिती करण्यासाठी अत्याधुनिक रोपवाटिकांची निर्मिती करावी. तसेच खाजगी क्षेत्रातील रोपवाटिकांमध्ये देखील दर्जेदार रोपांची निर्मिती करण्यावर भर द्यावा. गडचिरोली जिल्ह्यात राजमुंद्रीच्या धर्तीवर नवीन रोपवाटिकांची निर्मिती खाजगी यंत्रणा/मायनिंग कंपनी यांच्या मदतीने करुन पुढील काळात अवनत झालेल्या उपलब्ध क्षेत्रावर १ | वन विभाग | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट गाठावे. | | |
| १३. | **वृक्ष लागवड मोहीमेसाठी जन सहभाग घेणे.** | वृक्षलागवड मोहीम मिशन मोडवर राबविण्यात यावी, त्यामध्ये जास्तीत जास्त सामुदायिक सहभाग सुनिश्चित करावा. यामध्ये स्थानिक नागरिक, ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्था (NGOs), शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था आणि इतर भागीदारांचा सक्रीय सहभाग घ्यावा. ही मोहीम केवळ शासकीय उपक्रम न ठेवता जनआंदोलनाच्या स्वरूपात घेण्यात यावी. मोहीमेकरिता CSR निधी प्राप्त करावा.<br>मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या "एक पेड माँ के नाम" या मोहीमेमध्ये व्यापक सहभाग घ्यावा. | सर्व विभाग | तात्काळ |
| १४. | **कॅम्पा अंतर्गत उपलब्ध असलेला निधीचा वृक्ष लागवडीकरिता वापर करण्याबाबत.** | कॅम्पा कायद्यातील प्रावधाने तसेच केंद्र सरकारच्या कॅम्पाविषयक मार्गदर्शक सूचनांच्या अधिन राहून कॅम्पा निधीचा सक्रियरीत्या वृक्ष लागवडीसाठी वापर करावा. | वन विभाग | तात्काळ |
| १५. | **अभिसरण योजनेच्या अंमलबजावणीबाबत.**<br>➢ मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांनी अभिसरणांतर्गत केलेल्या कामांबाबत समाधान व्यक्त केले. तसेच सदर योजनेच्या माध्यमातून वृक्ष लागवडीसाठी कुशल निधी कमी पडत असल्यास कॅम्पा निधीचा वापर करण्याबाबतची तपासणी करण्याचे सुचवले. | वृक्ष लागवडीसाठी ग्रामसभेचा ठराव, छाननी समितीची मंजुरी व वर्ककोड देण्याची कार्यवाही संबंधीत जिल्हाधिकारी व त्यांच्या अधिनस्त यंत्रणेने तातडीने करावी. सचिव, रोहयो यांनी सुचविल्यानुसार पुढील कार्यवाही करावी. अभिसरण योजना प्रभावीपणे राबविण्याकरिता योजनेच्या शासन निर्णयात काही | रोहयो विभाग आणि सर्व जिल्हाधिकारी | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ➢ प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांनी अभिसरण योजनेची एक वर्षाच्या अंमलबजावणीनंतर निदर्शनास आलेल्या समस्या व अडचणींचा उल्लेख करुन अभिसरण योजनेमध्ये काही बदल आवश्यक असल्याचे नमूद केले.<br>➢ सचिव, रोहयो यांनी अभिसरण योजनेच्या समस्यांबाबत खालील प्रमाणे भाष्य केले:-<br>१) मागील वर्षी सन २०२४-२५ करिता १६ कोटी मनुष्यदिनाची निर्मिती झाली होती.<br>२) त्यामुळे अभिसरणांतर्गत वृक्ष लागवड व रोपवाटिकांसाठी आवश्यक असलेले मजुर उपलब्ध होऊ शकतील.<br>३) ज्या भागांमध्ये मजूर वन विभागाच्या कामास जाण्यास अनुत्सुक असल्यास अशा ठिकाणी ग्राम रोजगार सेवकांच्या मार्फत मजुरांचे एकत्रिकरण (Mobilise) करता येईल.<br>४) ग्राम रोजगार सेवक नसलेल्या ठिकाणी मजुरांची उपस्थिती नोंदवण्यासाठी लॉगिन क्रेडेंशियल वन विभागास उपलब्ध करुन देता येतील.<br>५) कुशल कामांचा प्रलंबित निधी प्राधान्याने वितरीत करण्याबाबत कार्यवाही करण्याचे तसेच ही योजना | सुधारणा आवश्यक असल्यास रोहयो विभागाशी विचारविमर्श करुन तसे वन विभाग प्रस्तावित करेल. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पूर्णपणे कार्यान्वित होण्याकरीता योग्य समन्वय आणि कामांचे नियोजन जिल्हास्तरावर वेळेत करणे आवश्यक आहे. | | | |
| १६. | CFR (Community Forest Resource) क्षेत्रावर वृक्ष लागवड करणे. | CFR क्षेत्राकरिता प्राधान्याने CFR व्यवस्थापन आराखडे तयार करावे व ते वन विभागाच्या कार्य आयोजनामध्ये समावेश करावे. त्यानंतर कार्य आयोजनातील नियोजनानुसार CFR क्षेत्रात वृक्ष लागवड करावी. | आदिवासी विभाग व वन विभाग | तात्काळ |
| १७. | सदर मोहीमेसाठी नोडल अधिकारी नियुक्ती. | सदर मोहीमेसाठी नोडल अधिकारी म्हणून अपर मुख्य सचिव (वने) राहतील. | वन विभाग | तात्काळ |
| १८. | योजनेचे संनियंत्रण. | मोहीमेचे नियोजन, अंमलबजावणी करणे, रोपलागवडीची माहिती अद्ययावत करणे आणि संनियंत्रण करण्यासाठी सर्व विभागांनी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करुन वन विभागास तात्काळ अवगत करावे. | सर्व विभाग | तात्काळ |

बैठकीच्या अंती सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले.

*********

(परिशिष्ट-अ)

वृक्ष लागवडीचे विभागनिहाय लक्ष्य

| विभाग | लक्ष्य | विभाग | लक्ष्य |
|---|---|---|---|
| रेशीम विभाग (७५०० acre x ५५००) | ४ कोटी | महसुल विभाग | ५ लक्ष |
| वन (एफडीसीएम, बांबू बोर्डसह) (२०००० Ha.) | २ कोटी | उद्योग विभाग | ५ लक्ष |
| कृषी / फलोत्पादन (५०००० Ha. x २००) | १ कोटी | गृह विभाग | ५ लक्ष |
| ग्रामीण विकास विभाग | १ कोटी | उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग | ५ लक्ष |
| नगरविकास विभाग | १ कोटी | जलसंधारण विभाग | ५ लक्ष |
| "एक पेड माँ के नाम- २.०" | ५० लक्ष | सहकार, विपणन आणि वस्त्रोद्योग विभाग | ४ लक्ष |
| महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | २० लक्ष | सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ लक्ष |
| राष्ट्रीय महामार्ग | २० लक्ष | ऊर्जा विभाग | ३ लक्ष |
| शालेय शिक्षण विभाग | २० लक्ष | आदिवासी विकास विभाग | ३ लक्ष |
| बांधकाम विभाग | १५ लक्ष | पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय विभाग | २ लक्ष |
| रेल्वे विभाग | २० लक्ष | महिला आणि बाल कल्याण विभाग | २ लक्ष |
| जलसंपदा विभाग | ५ लक्ष | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | २ लक्ष |
| डिफेन्स विभाग | ५ लक्ष | पर्यटन विभाग | १ लक्ष |